CIDCO WE MAKE CITIES

प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

सिडको शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-5650 0900; Fax: 91-22-5650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ninawe.mb@cidcoindia.com

दि. ६–०६–२००९

# सिडको अधिकाऱ्यांकरिता 'माहिती अधिकार अधिनियम'संदर्भात कार्यशाळा संपन्न

सिडकोतील विविध विभागांत नेमण्यात आलेल्या अपिलीय अधिकारी, जनमाहिती अधिकारी, साहाय्यक जनमाहिती अधिकारी आणि क्षेत्राधिकारी पदांवरील सर्व अधिकाऱ्यांकरिता 'यशदा'च्या सहाकार्याने 'माहितीचा अधिकार अधिनियम २००५' संदर्भात तीन टप्प्यांतील दोन दिवसीय कार्यशाळा संपन्न झाल्या. या अधिनियमासंदर्भात नव्याने समाविष्ट केलेल्या तरतुदी, अधिनियमाची व्याप्ती व अंमलबजावणी संदर्भात प्रशिक्षण आणि प्रबोधन, हा या कार्यशाळा आयोजनामागील उद्देश होता. दि. २३ ते २४ मे २००९ रोजी पहिल्या तुकडीकरिता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात अपिलीय अधिकारी, जनमाहिती अधिकारी आणि साहाय्यक जनमाहिती अधिकारी म्हणून काम पाहणाऱ्या ३० अधिकाऱ्यांचा समावेश होता. या पहिल्या कार्यशाळेचा अनुभव व उपयुक्तता लक्षात घेऊन महामंडळातील सर्व क्षेत्राधिकारी व वरीष्ठ हुद्यावरील अधिकाऱ्यांना या विषयाच्या कार्यशाळेत सामील करून घ्यावे असा निर्णय झाला, त्यानुसार दि. २७ व २८ मे २००९ या कालावधीत आणखी २ बॅचेसकरिता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. तद्नंतर दि. ३० व ३१ मे २००९ रोजी आणखी ३ बॅचेसकरिता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या ६ बॅचेसच्या माध्यमातून एकूण १७५ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या प्रशिक्षण कार्यशाळेचा लाभ घेतला. या कार्यशाळेत अधिनियमातील महत्त्वपूर्ण तरतुदी, दस्तऐवज व्यवस्थापन, स्वयंप्रेरणेने जाहीर करावयाची माहिती, सद्भावनेने करावयाची कृती, सकारण प्रत्युत्तर यासंबंधित विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळांकरिता यशदातर्फे **ॲड. एम. डी. महाशब्दे, श्री. गजानन देशमुख, श्री. प्रदीप देशमुख** आणि **श्री. रविकांत घोडीचोर** यांनी मार्गदर्शन केले. तर कार्यशाळा समन्वयक म्हणून **श्री. गाढे, श्री. अलमाले** आणि **श्री. नवीन यादव** यांनी परिश्रम घेतले.

या कार्यशाळांच्या आयोजनाकरिता व्यवस्थापकीय संचालक **श्री. जी. एस. गिल्ल** आणि सहव्यवस्थापकीय संचालक **श्री. दिलीप जाधव** यांचेही मार्गदर्शन लाभले.

कार्यशाळेच्या आयोजनाकरिता महाव्यवस्थापक (प्रशासन) **श्री. जे. बी. खानविलकर** यांच्या नेतृत्वाखाली **श्री. ई. एम. मेनन, श्री. अविनाश भोईर** व **श्री. दिनेश गायकवाड** यांनी परिश्रम घेतले.

---

कृपया वरील वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून / माध्यमातून ठळक प्रसिद्धी द्यावी, ही विनंती कळावे

**(डॉ. मोहन निनावे)**
जनसंपर्क अधिकारी, सिडको

प्रति ______________________

______________________